RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक १७]  सोमवार, फेब्रुवारी ८, २०१६/माघ १९, शके १९३७  [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी २०१६.

**आदेश**

**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१.**

क्रमांक मत्स्यवि. १११५/प्र.क्र. २८२/पदुम-१४.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने डॉ. कै. व्ही. एस. सोमवंशी यांचे अध्यक्षतेखाली पर्ससीन मासेमारी व त्याचा राज्याच्या किनाऱ्यावरील पारंपरिक मासेमारी व पर्यावरणावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित केली होती ;

आणि ज्याअर्थी, समितीने सखोल अभ्यासाअंती अहवाल व आपल्या शिफारशी शासनास १० मे २०१२ रोजी सादर केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, समितीने सदर अहवालात, डहाणू ते मुरूड हे क्षेत्र ट्रॉलसाठी निषिद्ध करण्याची शिफारस केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने सदर शिफारस स्वीकारली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन आदेश, कृषी व सहकार विभाग आदेश क्र. एफडीएक्स. १४८१/२२१६७/१८१/१२-एडीएफ, दिनांक १६ ऑगस्ट १९८३ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

आणि, म्हणून, महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ (१९८१ चा महा. चौपन्न) यांच्या कलम ४, पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन उक्त कलम ४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अ), (ब) व (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समित्यांशी विचार विनिमय केल्यानंतर, शासन आदेश, कृषी व सहकार विभाग, आदेश क्रमांक एफडीएक्स. १४८१/२२१६७/१८१/१२-एडीएफ, दिनांक १६ ऑगस्ट १९८३ मध्ये याद्वारे पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

उपरोक्त आदेशातील खंड (४) मधील पोट खंड (अ) ऐवजी खालील पोट-खंड दाखल करण्यात येत आहे :—

“ (अ) राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पालघर जिल्ह्यातील झाईपासून रायगड जिल्ह्यातील मुरूडपर्यंत आणि रत्नागिरीमधील बाणकोट ते बुरुंडी या क्षेत्रात सागरी किनाऱ्यापासून ५ वावांपर्यंतच्या खोलीत. ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चि. नि. सुर्यवंशी,**
शासनाचे सहसचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated 8th February 2016

### Order

MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.

No. MATSYAVI-1115/CR-282/ADF-14.— Whereas, the Government of Maharashtra had appointed the Committee under the Chairmanship of Late Dr. V. S. Somvanshi to study the status of purse seine fishing and its impact on the traditional fishing and ecology along Maharashtra Coast;

And Whereas, the said Committee has submitted the report after detailed study to the Government on the 10th May 2012 with recommendations ;

And Whereas, in the said report, the Committee has recommended no trawl should be allowed in the area from Dahanu to Murud ;

And Whereas, the Government of Maharashtra has accepted the said recommendation ;

And Whereas, the Government of Maharashtra has decided to amend the Government Order, Agriculture and Co-operation Department, No. FDX.1481/22167/181/12-ADF, dated the 16th August 1983.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 (Mah. LIV of 1981), the Government of Maharashtra having regard to the matters referred to in clauses (*a*), (*b*) and (*c*) of sub-section (*2*) of the said section 4, after consultation with the Advisory Committee constituted under section 3 of the said Act, hereby amends the Government Order, Agriculture and Co-operation Department, No. FDX.1481/22167/181/12-ADF, dated the 16th August 1983, as follows :—

In the said Order, in clause (*iv*), for sub-clause (*a*), the following sub-clause shall be substituted, namely :—

"(*a*) In the territorial waters of the State from Zai of Palghar District to the Murud of Raigad District, and from the seashore to 5 fathoms depth zone of the area between Bankot and Burondi in Ratnagiri District.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

C. N. SURYAVANSHI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.